# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) २०७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११: ०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०७ वी (तातडीची) बैठक **गुरुवार, दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.१४ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०६ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.१४ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०६ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुले, ५०० क्षमतेचे मुली, ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनी, ५० क्षमतेचे ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्याकरीता वसतिगृह, मा.कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम करणे, विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र इमारत उभारणे, School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed / M.P.Ed / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे, क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, अॅस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात आली.<br>तथापि, तक्त्यातील अ.क्र.०५ येथील कामाचे अंदाजीत किंमत रु.२० कोटी ऐवजी रु.१० कोटी करुन शेवटी तंत्रज्ञान संकुले इमारतीचा समावेश करावा व त्याकरीता रु.१० कोटी तरतूद करुन संपूर्ण प्रस्ताव निधी मागणीकरीता राज्य शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये एकूण रु. २०० कोटींची खालील कामे करण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | तंत्रज्ञान संकुल इमारत आणि उपकरणे | १५ कोटी |
| ०२ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ०३ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी | |
| | ०४ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी | |
| | ०५ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे तृतीयपंथी वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी | |
| | ०६ | अत्याधुनिक केंद्रीय आणि वैज्ञानिक उपकरणे केंद्र आणि प्रयोगशाळा | १५ कोटी | |
| | ०७ | कौशल्य विकास केंद्र इमारत आणि उपकरणे | १५ कोटी | |
| | ०८ | रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र अभ्यासिका इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |
| | ०९ | Artificial Intelligence and High-Performance Computing (AIHPC) इमारत बांधणे व उपकरणे खरेदी करणे. | १५ कोटी | |
| | १० | विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २० कोटी | |
| | ११ | वाहनतळ | ५ कोटी | |
| | १२ | क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करणे. | १५ कोटी | |
| | १३ | School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed. / M.P.Ed. / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |
| | १४ | मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १० कोटी | |
| | | एकूण | २०० कोटी | |

Mahd-

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० चे भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या अनुषंगाने असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांनी इंडियन नेटवर्क फॉर इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन (INIHE) च्या बॅनरखाली जपानी शैक्षणिक आणि औद्योगिक संस्था, विद्यापीठे यांच्यासोबत चर्चासत्रे आणि द्विपक्षीय बैठकींकरिता सहभाग शुल्क, प्रवास खर्च, Visa तसेच अनुषंगिक इतर आवश्यक खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांचे दि.२१/१०/२०२५ रोजीचा ई-मेलद्वारे, इंडियन नेटवर्क फॉर इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन (INIHE) च्या बॅनरखाली असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (AIU) दिनांक ११ ते १७ जानेवारी, २०२६ या कालावधीत जपानमध्ये भारतीय कुलगुरुंच्या शिष्टमंडळाचे आयोजन कलेले आहे. या शिष्टमंडळाचा प्रमुख उद्देश भारत आणि जपान यांच्या मधील उच्च शिक्षण क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहयोगाला चालना देणे, तसेच दोन्ही देशांतील विद्यापीठे आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील परस्परसंवाद व भागीदारी अधिक मजबूत करणे हा आहे.<br>या कार्यक्रमाचा भाग म्हणून टोकियो, ओसाका आणि क्योटो या शहरांमध्ये टोकियो विद्यापीठ, कानसाई विद्यापीठ, क्योटो यूनिव्हर्सिटी ऑफ ॲडव्हान्स्ड सायन्स (KUAS), टोकियो आंतरराष्ट्रीय विद्यापीठ तसेच JETRO यांसारख्या आघाडीच्या जपानी शैक्षणिक आणि औद्योगिक संस्थांसोबत चर्चासत्रे आणि द्विपक्षीय बैठकींचे आयोजन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणावर भर देत असून जागतिक नागरिक घडवण्यासाठी विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या देवाण-घेवाण, सहयोगी संशोधन आणि संयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे प्रतिष्ठित जागतिक संस्था आणि उद्योगांशी भागीदारीला प्रोत्साहन देण्याकरिता मा. कुलगुरु महोदय यांना निमंत्रित केले आहे.<br>सबब, राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या अनुषंगाने असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांनी इंडियन नेटवर्क फॉर इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन (INIHE) च्या बॅनरखाली जपानी शैक्षणिक आणि औद्योगिक संस्था, विद्यापीठे यांच्यासोबत चर्चासत्रे आणि द्विपक्षीय बैठकींकरिता सहभाग शुल्क रु.३.९० लाख रुपये अधिक १८% जीएसटी (एकूण ४,६०,२००/-) व त्याअनुषंगाने प्रत्यक्ष होणारा, प्रवास खर्च, Visa तसेच इतर आवश्यक खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | मा.कुलगुरु कार्यालय |
| ठराव: | **राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० चे भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या अनुषंगाने असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांनी इंडियन नेटवर्क फॉर इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन (INIHE) च्या बॅनरखाली जपानी शैक्षणिक आणि औद्योगिक संस्था, विद्यापीठे यांच्यासोबत चर्चासत्रे आणि द्विपक्षीय बैठकीमध्ये मा.कुलगुरु महोदय यांना सहभागी होण्यास व सहभाग शुल्क, प्रवास खर्च, Visa तसेच इतर अनुषंगिक खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात रिक्त असलेल्या १) कुलसचिव, २) अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा व मानवविज्ञान विद्याशाखा, ३) संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ व ४) संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदांची जाहिरात सूचना दै. सकाळ, इंडियन एक्सप्रेस, दै. लोकसत्ता एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेजमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या साप्ताहिकेत तसेच विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर सूचना (Notification) संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.२१/११/२०२५ पर्यंत होती.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन कुलसचिव या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने कुलसचिव पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचेमधून प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ४ ]</td><td>विद्यापीठ संकुलामधील शिक्षकांनी दरवर्षी अधिकाधिक संशोधनात्मक कार्य करावे आणि ते संशोधन शैक्षणिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित करावे, यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अशा गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या नियमित व कंत्राटी शिक्षकांना "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार" दरवर्षी ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) या दिवशी प्रदान करण्यात यावा, अशी अधिसभेनी केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: डॉ. मंगेश मोहन वेदपाठक, अधिसभा सदस्य यांना दिनांक ०३/१०/२०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या बैठकीसमोर खालीलप्रमाणे प्रस्ताव मांडला होता.<br>"विद्यापीठ संकुलामधील शिक्षकांनी दरवर्षी अधिकाधिक संशोधनात्मक कार्य करावे आणि ते संशोधन शैक्षणिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित करावे, यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने, अशा गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या नियमित व कंत्राटी शिक्षकांना "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार" दरवर्षी ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) या दिवशी प्रदान करण्यात यावा, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करण्यात येत आहे."<br>सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव ११ पारित करण्यात आला.<br>ठराव क्र. ११: सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ.शिरीष विठ्ठल शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, विद्यापीठ संकुलामधील शिक्षकांनी दरवर्षी अधिकाधिक संशोधनात्मक कार्य करावे आणि ते संशोधन शैक्षणिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित करावे, यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अशा गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या नियमित व कंत्राटी शिक्षकांना "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार" दरवर्षी ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) या दिवशी प्रदान करण्यात यावा, अशी अधिसभेनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.</td><td>आस्थापना विभाग (शिक्षक)</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र. ११ अन्वये केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१. विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी दरवर्षी अधिकाधिक संशोधनात्मक कार्य करावे आणि ते संशोधन शैक्षणिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित करावे, यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अशा गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या नियमित व कंत्राटी शिक्षकांना दरवर्षी ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) या दिवशी खालीलप्रमाणे दोन पुरस्कार प्रदान करण्यात यावेत.<br>i. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार<br>ii. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यंग सायंटिस्ट पुरस्कार (४० वर्षाखालील शिक्षकांसाठी)<br>२. सदर पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रु.१०,०००/- व प्रमाणपत्र असे राहील.<br>३. सदर पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>i. प्रा. लक्ष्मीकांत बसवरात दामा, प्र-कुलगुरु<br>ii. डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र. अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा<br>iii. डॉ. शिवाजी विश्वास शिंदे, प्र. अधिष्ठाता - वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>iv. डॉ. आय. जे. तांबोळी, प्र. अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा<br>v. डॉ. राजशेखर हिरेमठ, प्र. अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ५ ]</td><td>विद्यापीठ परिसरामधील शास्त्रीय उपकरणे केंद्रामध्ये नवीन उपकरणे ठेवण्यासाठी सध्या असलेल्या शास्त्रीय उपकरणे केंद्र इमारतीचे विस्तारीकरण करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.<br><br>टिपणी: विद्यापीठ परिसरामधील शास्त्रीय उपकरणे केंद्रामध्ये नवीन उपकरणे ठेवण्यासाठी सध्या असलेल्या शास्त्रीय उपकरणे केंद्र इमारतीचे विस्तारीकरण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र. २० अन्वये व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे. सदर प्रस्ताव डॉ. विकास दादाभाऊ कडू यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी अनुमोदन दिले. सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br><br>सबब, विद्यापीठ परिसरामधील शास्त्रीय उपकरणे केंद्रामध्ये नवीन उपकरणे ठेवण्यासाठी सध्या असलेल्या शास्त्रीय उपकरणे केंद्र इमारतीचे विस्तारीकरण करण्याबाबत अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>विद्यापीठ परिसरामधील शास्त्रीय उपकरणे केंद्रामध्ये नवीन उपकरणे ठेवण्यासाठी सध्या असलेल्या शास्त्रीय उपकरणे केंद्र इमारतीचे विस्तारीकरण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजी झालेल्या अधिसभेने ठराव क्र. २० अन्वये केलेली शिफारस स्विकारुन खालील अटींच्या अधिन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली.<br>१. मा. राजभवन, मुंबई यांच्याकडून प्राप्त दि.१५ जुलै, २०२१ रोजीच्या वास्तुविशारद पॅनल मधील Enviro Safe Consultant, Solapur यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करण्यास व त्यांचेकडून सविस्तर आराखडा तयार करण्यात यावा.<br>२. शास्त्रीय उपकरणे केंद्र इमारतीचे विस्तारीकरण करण्यासाठी रु.१.५० कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात यावी.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>तसेच सध्याच्या विद्यापीठ परिसरातील काही संकुलाचे नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये अहवाल सादर करावा.<br>१. प्रा. डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु – अध्यक्ष<br>२. सर्व संकुलांचे संचालक – सदस्य<br>३. प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे, Director, IQAC – सदस्य सचिव</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ६ ] | नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ (I.I.L) करिता विद्यापीठ परिसरामध्ये नवीन सुसज्ज अशी इमारत निर्माण करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ (I.I.L) करिता विद्यापीठ परिसरामध्ये नवीन सुसज्ज अशी इमारत निर्माण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र. १८ अन्वये व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.<br>सदर प्रस्ताव डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ (I.I.L) करिता विद्यापीठ परिसरामध्ये नवीन सुसज्ज अशी इमारत निर्माण करण्याबाबत अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ (I.I.L) करिता विद्यापीठ परिसरामध्ये नवीन सुसज्ज अशी इमारत निर्माण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजी झालेल्या अधिसभेने ठराव क्र. १८ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन खालील अटींच्या अधिन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली.**<br>१. **मा. राजभवन, मुंबई यांच्याकडून प्राप्त दि.१५ जुलै, २०२१ रोजीच्या वास्तुविशारद पॅनल मधील** Enviro Safe Consultant, Solapur **यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करण्यास व त्यांचेकडून सविस्तर आराखडा तयार करण्यात यावा.**<br>२. **शक्य असेल तिथे दर्शनी भागामध्ये सदरची इमारत निर्माण करण्यात यावी.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्राच्या इमारतीचे पुर्ननिर्माण करुन तेथे मुला-मुलींकरिता सुसज्ज अशी अभ्यासिका, अभ्यागतांसाठी विश्रामगृह, १५० क्षमतेचे सुसज्ज सभागृह, विद्यार्थी सुविधा केंद्र इ. निर्माण करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्राच्या इमारतीचे पुर्ननिर्माण करुन तेथे मुला-मुलींकरिता सुसज्ज अशी अभ्यासिका, अभ्यागतांसाठी विश्रामगृह, १५० क्षमतेचे सुसज्ज सभागृह, विद्यार्थी सुविधा केंद्र इ. निर्माण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र. १७ अन्वये व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.<br>सदर प्रस्ताव डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्राच्या इमारतीचे पुर्ननिर्माण करुन तेथे मुला-मुलींकरिता सुसज्ज अशी अभ्यासिका, अभ्यागतांसाठी विश्रामगृह, १५० क्षमतेचे सुसज्ज सभागृह, विद्यार्थी सुविधा केंद्र इ. निर्माण करण्याबाबत अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्राच्या इमारतीचे पुर्ननिर्माण करुन तेथे मुला-मुलींकरिता सुसज्ज अशी अभ्यासिका, अभ्यागतांसाठी विश्रामगृह, १५० क्षमतेचे सुसज्ज सभागृह, विद्यार्थी सुविधा केंद्र इ. निर्माण करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजी झालेल्या अधिसभेने ठराव क्र. १७ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन खालील अटींच्या अधिन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली.**<br>१. **मा. राजभवन, मुंबई यांच्याकडून प्राप्त दि.१५ जुलै, २०२१ रोजीच्या वास्तुविशारद पॅनल मधील** Enviro Safe Consultant, Solapur **यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करण्यास व त्यांचेकडून सविस्तर आराखडा तयार करण्यात यावा.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | **प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना विद्यापीठाची रंगभवन नजीक मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या अभ्यासकेंद्र येथील विश्रामगृहाशेजारील जागा प्रकल्प कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांचे जा.क्र.शाआशा-२०२५/प्र.क्र./का./२(१) २५७८ सोलापूर दि.२५/०९/२०२५ रोजीचे पत्र कृपया अवलोकनार्थ.<br>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर या कार्यालयाची नव्याने निर्मिती आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १८ जुन, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सोलापूर व धाराशिव या दोन जिल्हयाकरीता झालेली आहे. त्यानुसार प्रकल्प कार्यालय दि. १५ ऑगस्ट २०१२ पासुन प्रत्यक्षात सुरु झालेले आहे. या कार्यालयातंर्गत ३ शासकीय आश्रमशाळा, २ अनुदानित आश्रमशाळा व ६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. तसेच या कार्यालयामार्फत सोलापूर व धाराशिव जिल्हयातील अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या विविध योजना राबविल्या जातात. सदर कार्यालयास स्वत:ची शासकीय जागा इमारत प्राप्त नसल्याने कार्यालय अद्यापपर्यंत भाडेतत्वावरील इमारतीमध्ये कार्यरत आहे.<br>प्रकल्प कार्यालयास जागा प्राप्त करुन घेण्याकरीता संबंधित शासकीय विभागांशी पत्रव्यवहार करण्यात आला होता, तथापि, अद्यापपर्यंत जागा प्राप्त झालेली नाही.<br>प्रकल्प कार्यालयास स्वत:ची इमारत नसल्यामुळे अनुसुचित जमातीच्या योजना राबविण्यास तसेच सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यास अडचणी निर्माण होत आहेत. कार्यालयासाठी जागा प्राप्त झाल्यास त्यावर इमारत बांधकाम करुन सोयी सुविधा उपलब्ध करुन देता येतील. तरी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची रंगभवन नजीक मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिल्हा न्यायालयाजवळील सोलापूर विद्यापीठाच्या विश्रामगृहाशेजारील जागा प्रकल्प कार्यालयास उपलब्ध करुन | अभियांत्रिकी विभाग |

| | | |
|---|---|---|
| | दिल्यास या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यापर्यंत सहज पोहोचविणे शक्य होणार आहे. त्यामुळे सोलापूर विद्यापीठाची रंगभवन नजीक मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिल्हा न्यायालयाजवळील सोलापूर विद्यापीठाच्या विश्रामगृहाशेजारील जागा प्रकल्प कार्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात येत आहे.<br>तरी कृपया सहानुभुतिपुर्वक विचार करुन प्रकल्प कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राची असलेल्या जागेमध्ये अभ्यासकेंद्र इमारतीचे पुर्ननिर्माण करुन तेथे मुला मुलींकरिता सुसज्य अशा अभ्यासिका, अभ्यागतांसाठी विश्रामगृह, १५० क्षमतेचे सुसज्य सभागृह, विद्यार्थी सुविधा केंद्र इत्यादी निर्माण करण्याची शिफारस दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या अधिसभेने व्यवस्थापन परिषदेकडे केलेली आहे. सदर बाब विचारात घेता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना विद्यापीठाची रंगभवननजीक मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या अभ्यासकेंद्र येथील विश्रामगृहाशेजारील जागा प्रकल्प कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापीठाच्या रंगभवन येथील विश्रामगृहाशेजारील जागेत नियोजित प्रकल्पाचे नियोजन झालेले असल्याने सदरची जागा उपलब्ध करुन देवू शकत नसल्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना कळविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१)] | **विद्यापीठाच्यावतीने शारजाह रिसर्च, टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्क (SRTIP) दुबई येथे टेक्सटाईल, कृषी -फूड चेन आणि स्मार्ट IT अनुप्रयोग या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यास तसेच विद्यापीठाच्यावतीने प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याकरिता दोन सदस्यांना मान्यता व तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठामार्फत शारजाह रिसर्च, टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्क (SRTIP), दुबई यांच्या सहकार्यान "टेक्सटाईल, कृषी-फूड चेन आणि स्मार्ट IT अनुप्रयोग" या आंतरराष्ट्रीय परिषद आयोजन करण्याचा प्रस्ताव आहे. या कार्यक्रमाचा उद्देश शैक्षणिक - औद्योगित सहकार्य वाढवणे आंतरराष्ट्रीय सहयोग प्रस्थापित करणे आणि विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील अनुभव देणे आहे.<br>तसेच सदर आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय टेक्सटाईल व होम-टेक्सटाईल तंत्रज्ञान, कृषी-फूड चेन, प्रक्रिया व शाश्वतता आणि स्मार्ट IT अनुप्रयोग, AI आधारित औद्योगिक उपाय करणे आहे.<br>सबब, विद्यापीठाच्यावतीने शारजाह रिसर्च, टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्क (SRTIP) दुबई येथे टेक्सटाईल, कृषी -फूड चेन आणि स्मार्ट IT अनुप्रयोग या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यास तसेच विद्यापीठाच्यावतीने प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याकरिता दोन सदस्यांना मान्यता व तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्च रु.२,७५,०००/- व इतर प्रत्यक्ष आवश्यक खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | **विद्यापीठाच्यावतीने शारजाह रिसर्च, टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्क (SRTIP) दुबई येथे टेक्सटाईल, कृषी -फूड चेन आणि स्मार्ट IT अनुप्रयोग या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यास, विद्यापीठाच्यावतीने प्रतिनिधी म्हणून प्र-कुलगुरु व सीईओ, उद्यम फाऊंडेशन यांना उपस्थित राहण्याकरिता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच प्र-कुलगुरु यांच्याकरीता होणारा खर्च हा विद्यापीठ फंडातून व सीईओ, उद्यम फाऊंडेशन यांच्याकरीता होणारा खर्च हा उद्यम फाऊंडेशन मधून करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | | विभाग |
|---|---|---|---|
| [९(२)] | दि.२६/११/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.२६/११/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.२६/११/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दि.०६/०८/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | | |
| | ठराव क्र. १ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र. २ | इमारत व बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन “रु.१६० कोटी” ऐवजी “रु.२०० कोटी” निधी खर्चाची तरतूद करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |
| | ठराव क्र. ३ | इमारत व बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच वारकरी संप्रदायाचा सखोल अभ्यास करण्यासाठी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदीर समिती श्रीक्षेत्र, पंढरपूर येथे “वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र” सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात गठीत केलेल्या समितीमध्ये सदस्य म्हणून डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांचे नाव समाविष्ठ करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |
| | ठराव क्र.४ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र.५ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र.६ | विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील विस्तारीत मुख्य प्रशासकीय इमारत ते खेलो इंडिया योजनेतंर्गत मल्टीपर्पज हॉल इमारतीपर्यत सुरु असलेल्या इलेक्ट्रीफिकेशनच्या कामामधील इलेक्ट्रीक केबल टाकण्याच्या कामा ऐवजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याकडून सुरु असलेल्या कामामधील सुस्थितीतील जुने पोल, तारा या पुर्नवापर करुन केबलच्या ठिकाणी बसवून घेण्यास व सदरचे काम हे मल्टीपर्जज हॉल इलेक्ट्रीकल कामाच्या मक्तेदाराकडून किंवा स्वतंत्र निविदा मागवून करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ठराव क्र.७ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र.८ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र.९ | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. | |
| | ठराव क्र.१० | इमारत व बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच विद्यापीठ गेट समोरील व रंगभवन येथील फुट वेटर ब्रिजवरती दोन्ही बाजूस जाहिरात करणे, विद्यापीठाचा Reflective Board बसविण्यास व त्यासाठी रु.२ लक्ष इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तथापि, यापूर्वी सर्व शासकीय कार्यालयांची प्रशासकीय मान्यता घेवून सदरचे काम करण्यात यावे असे ठरले. | |
| | ठराव क्र.११ | इमारत व बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | ठराव क्र.१२ | सदर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | ठराव क्र.१३(१) | सदर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | ठराव क्र.१३(२) | सदर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | ठराव क्र.१३(३) | इमारत व बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच सदर कामाची निगराणी करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे Quality Monitoring Committee गठीत करण्यात आली.<br>१. डॉ. सुशिल कुमार शिंदे - अध्यक्ष<br>२. कुलसचिव - सदस्य<br>३. श्री. गिरीश कुलकर्णी, विद्यापीठ अभियंता - सदस्य सचिव | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(३)] | **परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०८/१०/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.९(१) व प्रमाद समितीच्या निर्णयानुसार परीक्षा केंद्र ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर यांना देण्यात आलेले नाही. सदर महाविद्यालयाची मार्च/एप्रिल, २०२५ ची प्रथम वर्ष परीक्षा ही डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर व डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर येथे घेण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त ठराव क्र.९(१) व प्रमाद समितीच्या शिफारसीनुसार ज्या महाविद्यालयाची प्रथम वर्षाची परीक्षा काही कारणास्तव अन्य महाविद्यालयात घेतल्यास संबधित परीक्षा घेणाऱ्या महाविद्यालयास प्रथम वर्ष परीक्षा फीची ४०% ऐवजी ४५% रक्कम आदा करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मार्च/एप्रिल, २०२५ च्या विद्यापीठ परीक्षा संलग्नित महाविद्यालयामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. परीक्षा प्रमाद समितीच्या निर्णयानुसार परीक्षा केंद्र ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास प्रथम वर्ष परीक्षा केंद्र देण्यात आलेले नाही.<br>सदर बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०८/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत ठेवली असता, सदर बैठकीतील ठराव क्र.९(१) नुसार ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर यांना परीक्षा केंद्र देण्यात आलेले नाही. सदर महाविद्यालयाची मार्च/एप्रिल, २०२५ ची प्रथम वर्ष परीक्षा ही डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर व डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर येथे घेण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त ठराव क्र.९(१) व प्रमाद समितीच्या शिफारसीनुसार ज्या महाविद्यालयाची प्रथम वर्षाची परीक्षा काही कारणास्तव अन्य महाविद्यालयात घेतल्यास संबंधित परीक्षा घेणाऱ्या महाविद्यालयास प्रथम वर्ष परीक्षा फीची ४०% ऐवजी ४५% रक्कम देण्याबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, परीक्षा प्रमाद समितीच्या शिफारसीनुसार व परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०८/१०/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.९(१) नुसार ज्या महाविद्यालयाची प्रथम वर्षाची परीक्षा काही कारणास्तव अन्य महाविद्यालयात घेतल्यास संबधित परीक्षा घेणाऱ्या महाविद्यालयास प्रथम वर्ष परीक्षा फीची ४०% ऐवजी ४५% रक्कम आदा करण्याची शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मुल्यमापन विभाग |
| ठराव: | **परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०८/१०/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.९(१) अन्वये, ज्या महाविद्यालयाची प्रथम वर्षाची परीक्षा काही कारणास्तव अन्य महाविद्यालयात घेतल्यास संबधित परीक्षा घेणाऱ्या महाविद्यालयास प्रथम वर्ष परीक्षा फीची ४०% ऐवजी ४५% रक्कम अदा करण्याबाबत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(४)] | **Spiral Thesis बाबत (Pre Viva) मध्यवर्ती प्रवेश समितीच्या (CAC) बैठकीकरीता उपस्थित मार्गदर्शक यांना TA/DA अदा करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मा. अधिसभा सदस्य, प्राचार्य. डॉ. अनंत बाळू शिंगाडे यांचे दि. २७/११/२०२५ रोजीचे प्राप्त पत्र.<br>संदर्भीय पत्रान्वये मा. अधिसभा सदस्य, प्राचार्य डॉ. अनंत बाळू शिंगाडे यांनी मध्यवर्ती प्रवेश समितीच्या (CAC) बैठकीकरीता उपस्थित राहिल्यामुळे TA/DA अदा करण्याबाबत विनंती केली आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी याबाबत पीएच.डी. विभागास विचारणा केली असता संबंधित मार्गदर्शकास TA/DA अदा केला जात नसल्याचे नमुद केले असून, त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचे संशोधन केंद्र हे विद्यापीठ असल्याने व विद्यार्थी त्यांची फी विद्यापीठात भरत असल्याने विद्यापीठाकडून TA/DA दिला गेला पाहिजे असे नमुद केले आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, प्रस्तुत विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रवेशीत विद्यार्थ्यांचे Spiral Thesis (कच्चे प्रबंध) प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ नियमावलीनुसार मध्यवर्ती प्रवेश समितीकडे (CAC) मूल्यमापनाकरीता पाठवून समितीची बैठक घेतली जाते. सदर बैठकीमध्ये अध्यक्ष, ०२ विषयतज्ञ व अभ्यासमंडळे सदस्य असे समिती सदस्य आहेत. तथापि, संबंधीत विद्यार्थ्याचे मार्गदर्शक हे CAC चे सदस्य नाहीत. तथापि, सदर बैठकीस विद्यार्थी व मार्गदर्शक यांना समितीसमोर आपल्या विषयाचे सादरीकरण करण्याकरीता उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येते. संशोधक मार्गदर्शक हे CAC चे सदस्य नसल्यामुळे त्यांना TA/DA दिला जात नाही.<br>तसेच Spriral Thesis जमा करण्याकरीता विद्यापीठाकडून संशोधक विद्यार्थ्यास कोणतेही शुल्क आकारले जात नाही. संशोधक विद्यार्थ्याचे प्रवेश व इतर शुल्क संशोधन केंद्राकडे जमा होते. त्यामुळे संशोधक मार्गदर्शकांनी संबंधीत संशोधन केंद्राकडून TA/DA घेणे अपेक्षित आहे.<br>सबब, Spiral Thesis बाबत (Pre Viva) मध्यवर्ती प्रवेश समितीच्या (CAC) बैठकीकरीता उपस्थित मार्गदर्शक यांना TA/DA अदा करण्याची बाब विचारार्थ. | संशोधन विभाग |
| ठराव: | **Spiral Thesis बाबत (Pre Viva) मध्यवर्ती प्रवेश समितीच्या (CAC) बैठकीकरीता उपस्थित मार्गदर्शक यांना संबंधित संशोधन केंद्राने TA/DA अदा करावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(५)] | **विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुलातील मा. संचालक, शिक्षक व विद्यार्थी यांचेकरिता आस्थापना विभागांतर्गत “State, National, International Level Conference / Seminar / Workshop TA/DA for All School Directors, Teachers and students” अंदाजपत्रकीय तरतूद या बजेट पासून नव्याने सुरु करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरात सद्यस्थितीत एकूण ११ संकुले कार्यरत आहेत. सदर संकुलातील मा. संचालक, शिक्षकवृंद व विद्यार्थी अनेकवेळा राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र / कार्यशाळा याकरिता जात असतात. संकुलातील मा. संचालक, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांकरिता सदर चर्चासत्र व कार्यशाळेस जाण्याकरिता दैनंदिन भत्ता, प्रवास भाडे व रजिस्ट्रेशन चार्जेस विद्यापीठाकडून देण्याकरिता आस्थापना विभागांतर्गत नव्याने बजेटहेड सुरु करणे आवश्यक आहे.<br>सबब, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुलातील मा. संचालक, शिक्षक व विद्यार्थी यांचेकरिता आस्थापना विभागांतर्गत “State, National, International Level Conference / Seminar / Workshop TA/DA for All School Directors, Teachers and students” अंदाजपत्रकीय तरतूद या बजेट पासून नव्याने सुरु करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुलातील मा. संचालक, शिक्षक व विद्यार्थी यांचेकरिता आस्थापना विभागांतर्गत “State, National, International Level Conference / Seminar / Workshop TA/DA for All School Directors, Teachers and students” हे अंदाजपत्रकीय लेखा शिर्षक सुरु करण्यास व त्याअंतर्गत रु. १० लाख ची तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(६)] | मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर संचलित छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य नियुक्ती संदर्भात नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल मिळणेबाबत. | शिक्षक मान्यता |
| ठराव: | मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर संचलित छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य नियुक्ती संदर्भात नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार संस्थेस कळविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद